# डॉ.भिमराव रामजी आंबेडकर : शिक्षण विषयक विचार

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## १. प्रस्तावना

डॉ.भिमराव रामजी आंबेडकर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून ओळखले जाते. भारतीय साविधानाचे शिल्पकार भारताच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व्यवस्थेवर कायमचा ठसा उमटवणारे कृतीशील विचारवंत होते. तसेच सामाजिक, आर्थिक लोकशाही भारतात यावी यासाठी सतत धडपणारे व विचार मांडणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय.

मागासवर्गीयांचा मसिहा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पैलूच अधिक सांगितला जातो. तसेच देशाची एकता यासाठी त्यानी केलेले मुलभूत कार्य तितकेच महत्वाचे आहे.

डॉ.आंबडेकर हे थोर समाजसेवक, राजनितज्ञ, प्रकांड कायदे पंडीत आणि श्रेष्ठ विचारवंत होते. स्वतंत्र बुद्धीने प्रामाण्याच्या आधारावर निर्णय घेण्याची त्यांची क्षमता उच्च प्रतीची होती. निर्भय, परिश्रमी आणि वाईट रूढी विरुद्ध दंड थोपटून उभा राहिलेला श्रेष्ठ पुरषोत्तम म्हणून इतिहास त्याची गणना करील झुंजारपणा हा त्यांच्या स्वभावाचा विशेष आहे.

दीन दलित मग ते कोणत्या जातीचे असोत त्यांचे बदल त्यांना मनापासून कळवळा वाटत होता. एक जबरदस्त शक्तिप्रवाह डॉ. आंबेडकरांच्या विचारानी तयार केला. दलितात स्वाभिमान व स्वत्त्व त्यानी जागविले .त्यांचे अस्तित्व म्हणजे नव्या युगाची नवी पहाटच होती.

## २. चरित्र

आधुनिक काळातील एक थोर विचारवंत, झुंजार नेते, प्रभावी समाज सेवक आणि प्रकांड व घटनातज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली मध्य प्रदेशातील महू या गावी एका गरीब आणि दुर्दैवी अशा अस्पृश्य घराण्यात झाला. त्यानी आपले सुरवातीचे शिक्षण दापोली येथे पूर्ण केले. सन. १९०० पासून प्रथम सातारा येथे आणि त्या नंतर १९०४ पासून मुंबई येथे एल्फिनस्टन हायस्कूल मध्ये त्यांचे शिक्षण झाले. त्यांचे वडील सैन्यात सुभेदार होते.

आंबवडे हे त्यांचे मूळ गाव त्यावरून आंबेडकर हे त्यांचे नाव पडले शाळेत

शिक्षण घेत असतांना त्यांना अस्पृश्य जातीचे म्हणून खूपच त्रास सोसावा लागला. अनंत अडचणी आणि अपमान यास तोंड द्यावे लागले.

वयाच्या सोळाव्य वर्षी सन. १९०७ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एल्फिनस्टनमहाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला याच काळात ते विवाहबद्ध झाले. गायकवाड यांच्याकडून मिळालेल्या शिष्यवृतीच्या आधारे सन.१९१३ मध्ये बी.ए.ची पदवी संपादन केली सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना अमेरिकेत जाण्यास मदत केली. तेव्हा त्यानी अमेरिकेत न्युयोर्क मधील कोलंबीया विद्यापीठात प्रवेश घेऊन एम.ए. पदवी संपादन केली. भारतातील जातीची वाढ व उत्पतीवर प्रबंध लिहिला. त्यामुळे त्यांना पी.एच.डी ही पदवी मिळाली.

अमेरिकेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर बडोदा येथे लष्करी सचिव म्हणून कार्य करीत असताना अस्पृश्यतेचा त्रास होऊ लागला म्हणून ती नोकरी सोडून ते मुंबईला परत आले. सन १९१७ मध्ये मुंबई येथे सिडनेहन महाविद्यात प्राध्यापकाची नोकरी पत्करली मध्यंतरीच्या काळात त्यानी “मूकनायक” आणि “बहिष्कृत भारत” या नावाची वर्तमान पत्रे चालवली. सन. १९१८ साली नोकरीचा राजीनामा दिला. व ते कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले. भारतात परत आल्यावर त्यांनी दलितांच्या उधारसाठी त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. सन. १९२० मध्ये पुन्हा लंडनला गेले. सन. १९२१ मध्ये एम.सी.सी. ची पदवी बहाल करण्यात आली. त्यानंतर त्यांनी लंडन मध्ये डी.एस.सी. ची पदवी मिळविली.

भारतात परत आल्यावर मुंबई येथे बॅरीस्टर म्हणून कार्य सुरु केले. परंतु अस्पृश्य हा शिक्का असल्याने त्यांना या व्यवसायात फारशे यश आले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्वत:च अस्पृश्यते विरुद्ध चळवळ सुरु केली या क्रांतीकारी चळवळी मुळेच ते अस्पृश्योधारक म्हणून प्रसिद्ध झाले. सन.१९२७ मध्ये त्यांची मुंबई प्रांताच्या कायदे मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ति झाली. सन. १९२८ मध्ये सायमन कमिशन पुढे साक्ष देऊन अस्पृश्यसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. सन.१९३० मध्ये अस्पृश्याचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडमध्ये गोलमेज परिषदेस उपस्थित होते.

सामाजिक सुधारणांसाठी त्यानी “मनुस्मृती दहन” महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रहा सारखी आंदोलने करून जगजाग्रण केले. गांधीजींशी सन.१९३२ मध्ये करार करून अस्पृश्यांसाठी कायदे मंडळात जागा मिळवून घेतल्यात. सन.१९३५ मध्ये मुंबईच्या लॉ कॉलेजच्या प्राचार्य पदी नेमणूक झाली. सन.१९३७ मध्ये प्रांतिक निवडणुकीच्या वेळी अस्पृश्याच्या हित रक्षणासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. सन.१९४२ मध्ये त्यांची व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळावर कामगार खात्याचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली. सन.१९४६ मध्ये ते बंगालमधून घटना समिती वर निवडून

आले. घटना समितीचे मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यानी केलेल्या कामामुळे ते भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.

भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून कोलंबीया विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही पदवी सन्मानपूर्वक बहाल केली. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर त्यानी मंत्री मंडळात कायदे मंत्री म्हणून कार्य सुरु केले. सन.१९५१ साली बौद्ध जनसंघ स्थापन केला. सन.१९५६ मध्ये नागपूर येथे बौध्द धर्माचा स्वीकार केला. व त्यांचा मृत्यू ६ डिसेंबर १९५६ रोजी झाला आजही या विचारवंताचे विचार अमर आहे.

**३. शिक्षण विषयक विचार**

**अ. राज्य व शिक्षण :-**

डॉ. आंबेडकराना आपल्या देशातील निरक्षरता व शैक्षणिक मागासलेपणा यांची पूर्ण जाणीव होती. शिक्षण ही समाजाची अत्यंत महत्वाची गरज आहे. सामाजिक प्रगतीचे ते एक मोठे साधन आहे. हे ही ते जाणत होते. शिक्षण हा व्यक्ति च्या प्रगतीच्या व सामाजिक विकासाचा पाया आहे. शैक्षणिक प्रगती शैक्षणिक विकास यांचा जवळचा संबध आहे. हे ते ओळखून होते. म्हणून राज्याने दलितांच्या शैक्षणिक उद्धारासाठी लक्ष पुरविले पाहिजे. अशी त्यांची मागणी होती. त्यांच्या मते शैक्षणिक सुविधा पुरवण्याची जास्तीत जास्त जबाबदारी राज्यावर आहे. तसेच शासनाने हे ही पहिले पाहिजे कि, पुरविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधांचा जास्तीत जास्त फायदा समाजातील सर्व वर्गांना मिळतो. यास्तव शैक्षणिक कार्यात शासकीय प्रयत्नाचे स्वागत ही त्यानी केलेले दिसून येते.

**ब. स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वतंत्र**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री शिक्षणावर भर दिला. त्याचे मते स्त्रियांना शिक्षण मिळाल्यास कुटुंबाचा खरा विकास होईल.जीवनमान सुधारण्यासाठी चांगेल संस्कार करून कुटुंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे.

हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी हिंदू स्त्रियांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. मात्र मतभेद झाल्यामुळे त्यानी हिंदू कोड बिलाच्या प्रश्नावर केंद्रीय मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला नंतर त्यांचाच विचारावर आधारित काही कायदे भारतीय शासनाला करावे लागले. हे सर्व कायदे हिंदू कोड बिलावर आधारीत होते. बाल विवाहास विरोध, विधवा विवाहास आणि आंतरजातीय, विवाहास उत्तेजन ही त्यांच्या विचाराची विविध रूपे होती.

**क. स्त्री पुरुष समानता**

डॉ. आंबेकरांचे स्त्री पुरुष समानता असावी असे आग्रही मत होते. ही

समानता होण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग त्यानी सांगितला. स्त्रियांना समाजात व कुटुंबात उत्तम वागणूक व समान दर्जा मिळाला पाहिजे. स्त्री शिक्षणाने कुटुंब पुढे जाते. स्त्री अडाणी असली तर कुटुंबाची उन्नती होत नाही असे आंबेडकरांचे मत होते.

स्त्रीयांनी उत्तम कपडे, दागिने, यासाठी हट्ट न धरता स्वच्छ, टापटीप असावे. गुणवतेवर व चारित्र्यावर भर द्यावा. मुलामुलींवर चांगले संस्कार करावेत. असा डॉ.आंबेडकरांचा स्त्रियांना उदेश होता.

### ड. निरक्षरता

भारतीय लोकांची निरक्षरता हा विकास, उन्नतीतील फार मोठा अडथळा आहे. ब्रिटीशांचा काळात फारच थोड्या लोकांनी उच्च शिक्षण घेतले. बहुसख्य लोक अडाणीच राहिले. लोकशाही ही. लोकांनीच चालवयाची असते. त्यामुळे राज्य कारभाराचे आवश्यक ज्ञान व त्यासाठी शिक्षण असावे लागते. यातून डॉ. आंबेडकरानी समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

### ४. समारोप

आपल्या देशातील सर्व स्तरावरील शिक्षणाला व्यापकपणे लागू पडणारे विचार डॉ.आंबेडकरानी मांडले. शिक्षणाची ध्येये विद्यापीठ शिक्षण, नैतिक शिक्षण , व्यवसाय, शिक्षण, प्राध्यापक या संबंधी त्यानी मांडलेले विचार हे आजही उपयुक्त आहेत. त्यानी व्यक्त केलेल्या अपेक्षा या तर आपल्या शिक्षणाची सुधारणा करण्याचा व दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने निश्चितच प्रेरक मार्गदर्शक आहेत.

### संदर्भ पुस्तके

१. २१ व्या शतकाच्या विकासासाठी शिक्षण, लेखक - प्रा.ए. एस गोल्हार, प्रा. के डी. शिंदे, प्रकाशन- श्री प्रकाशन पुणे

२. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, लेखक - डॉ. वा. भा. पाटील प्रकाशन- प्रशांत पाब्लीकेशन, जळगाव

३. शाहूंच्या आठवणी, लेखक प्रा. नानासाहेब साळुंखे प्रकाशन- वृषाली प्रकाशन, कोल्हापूर